**आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना तातडीची मदत मिळवून देण्यासाठी जिल्हास्तरीय समितीचे पुनर्गठण करुन त्याच धर्तीवर तालुका स्तरीय समितीचे गठण करणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक/एससीवाय-२०२५ /प्र.क्र.७५/म-७**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दि. ०६ एप्रिल, २०२६

**संदर्भः-**

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७ दि.१९.१२.२००५
२. शासन निर्णय क्र. एससीवाय-१०२५/प्र.क्र. १८९/म-७ दि. २३ जानेवारी २००६
३. शासन निर्णय क्र. कार्यशा-२०२५/प्र.क्र.०६/म-८ दि. ०९.०४.२०२५

**प्रस्तावनाः-**

संदर्भ क्र. १ व २ अन्वये राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्याप्रकरणी शेतकऱ्यांच्या विकासासाठी व कल्याणासाठी विविध उपाययोजना अंतर्भूत करण्यात आलेल्या आहेत. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून निश्चित केलेल्या निकषानुसार मदत देण्यात येत होती. आता ही मदत -सामाजिक सुरक्षा व कल्याण॰ या लेखाशिर्षाखाली नियमित अर्थसंकल्पातून आवश्यक निधी उपलब्ध करुन पुरविण्यात येत आहे. वारसांना मदत देण्याचा निर्णय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समिती तहसीलदार आणि तालुकास्तरीय अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या अहवालाआधारे मदत मंजूर करत आहे.

संदर्भ ३ वरील शासन निर्णय दि. ०९.०४.२०२५ नुसार स्थापन करण्यात आलेल्या समितीने सदर प्रक्रिया पार पाडतांना होणारा विलंब कमी करुन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबास तातडीने मदत मिळावी, या हेतूने जिल्हास्तरीय समितीचे पुनर्गठण आणि त्याच धर्तीवर तालुकास्तरीय समिती गठित करण्याची शिफारस केली आहे. सदर शिफारशींस अनसुरून शेतकरी आत्महत्या जिल्हास्तरीय संमितीच्या संरचनेत बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाच्या विकासासाठी व कल्याणासाठी गठित करण्यात आलेल्या शेतकरी आत्महत्या जिल्हास्तरीय समितीच्या संरचनेत अंशतः बदल करुन सदर समितीमध्ये जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, व्यवस्थापक जिल्हा अग्रणी बँक यांचा समावेश करण्याची शिफारस संदर्भ क्र. ३ नुसार शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या अभ्यास समितीने केली आहे. सदरहू शिफारस स्विकारल्याने शेतकरी आत्महत्या जिल्हास्तरीय समितीची संरचना आता खालीलप्रमाणे राहिल:-

## शेतकरी आत्महत्या जिल्हास्तरीय समिती

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद | सदस्य सचिव |
| ४. | जिल्हा पोलिस अधीक्षक | सदस्य |
| ५. | जिल्हा शल्य चिकित्सक | सदस्य |
| ६. | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ७. | जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी | सदस्य |
| ८. | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था | सदस्य |
| ९. | व्यवस्थापक अग्रणी बँक | सदस्य |
| १०. | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | सदस्य |
| ११. | सहायक आयुक्त, समाज कल्याण | सदस्य |
| १२. | सहायक संचालक जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजगता मार्गदर्शन केंद्र | सदस्य |
| १३. | जिल्हा समन्वय महात्मा फुले जन आरोग्य अभियान | सदस्य |
| १४. | जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन | सदस्य |
| १५. | शेतकरी प्रतिनिधी | सदस्य |
| १६. | सामाजिक संस्थेचा प्रतिनिधी | सदस्य |

उक्त जिल्हास्तरीय समितीच्या धर्तीवर तालुकास्तरीय समितीची रचना ही खालीलप्रमाणे राहिल.

## शेतकरी आत्महत्या तालुकास्तरीय समिती

| | | |
|---|---|---|
| १. | उपविभागाचे उपविभागीय अधिकारी (SDM) | अध्यक्ष |
| २. | तहसिलदार | सदस्य सचिव |
| ३. | गटविकास अधिकारी | सदस्य |
| ४. | पोलिस निरीक्षक | सदस्य |
| ५. | तालुका स्तरीय वैद्यकिय अधिकारी | सदस्य |
| ६. | तालुका आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ८. | सहायक, निबंधक सहकारी संस्था | सदस्य |
| ९. | तालुका प्रतिनिधी अग्रणी बँक | सदस्य |
| ११. | तालुका समन्वय महात्मा फुले जन आरोग्य अभियान | सदस्य |
| १२. | तालुका स्तरीय सहायक आयुक्त पशुसंवर्धन | सदस्य |
| १३.. | शेतकरी प्रतिनिधी | सदस्य |
| १४. | सामाजिक संस्थेचा प्रतिनिधी | सदस्य |

वरीलप्रमाणे जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय समितीचे गठण करुन जिल्हाधिकारी यांनी अहवाल सादर करावा. समितीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रकरणे तातडीने निकाली काढून अहवाल शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०४०६१८४९३३०८१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SNEHAL SANTOSH SAWANT

Digitally signed by SNEHAL SANTOSH SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=B35DC557BB39B4C779DBC7FABB797DEB54EFE31547ABCAF6A53497959D207A91, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=145C76C7B01294A3236E8066F60DC011E691193721BDB0B1D85AC27D7B50F8F1, cn=SNEHAL SANTOSH SAWANT
Date: 2026.04.06 18:50:29 +05'30'

**(स्नेहल सावंत)**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) सर्व मा. मंत्री , यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा.राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८) सर्व सन्मानीय विधानसभा सदस्य
९) सर्व सन्मानीय विधानपरिषद सदस्य
१०) मा. मुख्य सचिव (महाराष्ट्र राज्य) यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुचई,
११) अपर मुख्य सचिव (महसूल), यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
१२) अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई,
१३) विभागीय आयुक्त (सर्व),
१४) आयुक्त, सहकार
१५) जिल्हाधिकारी (सर्व)
१६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१७) जिल्हा पोलीस अधिक्षक (सर्व)
१८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
२०) महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
२१) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
२२) जिल्हा नियोजन अधिकारी (सर्व),
२३) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व),
२४) कार्यासन अधिकारी (ब-१), महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई
२५) वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६), मंत्रालय, मुंबई
२६) नियोजन विभाग (कार्यासन १४८१) मंत्रालय, मुंबई
२७) निवड नस्ती (कार्यासन/म-७)